
गुप्त खजिना

खूप जुनी गोष्ट आहे. एक होता शेतकरी. त्याला तीन मुलगे होते. तिघेही खूप आळशी होते.

दिवसभर फक्त खाणे आणि झोपणे एवढेच त्यांना ठाऊक होते.



एकदा शेतकरी आजारी पडला. त्याने मुलांना उशाशी बोलावले. "मुलांनो, मी आपल्या शेतात धनाने भरलेली पेटी कुठेतरी पुरून ठेवली आहे, पण कुठे ते आठवत नाही." तो उद्गारला.

वडिलांच्या निष्काळजीपणावर वैतागलेल्या मुलांनी अख्खे शेत खणून काढले.




त्यांना काहीच धन सापडले नाही आणि त्यांनी तसे वडिलांना सांगितले. ते हसून म्हणाले, "बरे, आत्ता नाही तर लवकरच सापडेल."

शेत अनायसे नांगरले आहेच, तर आता पेरणी सुद्‌धा करावी असा मुलांनी विचार केला.



शेतात लवकरच भरभरून पीक आले आणि मुलांना पीक विकून खूप पैसे मिळाले. वडिलांनी मुलांना हाच शेतातील खजिना असल्याचे सांगितले!



मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

भूत

मुल्ला नसीरुद्दीनकडे एकदा एक माणूस सल्ला विचारण्यासाठी आला.



"मला रोज स्वप्न पडते, की माझ्या पलंगाखाली भूत आहे. पण मी उठून बघतो तर काहीच नसते. त्यांनतर मला अजिबात झोप लागत नाही." तो उदासपणे म्हणाला.

"तुझी समस्या सोडवण्यासाठी तू काय प्रयत्न केलास?" मुल्ला ने विचारले.

"मी वैद्याकडे गेलो." त्याने उत्तर दिले.


"मग वैद्य काय म्हणाला?"मुल्लाने विचारले.

"त्याने इलाज करण्याचे शंभर दिनार मागितले." माणसाने सांगितले.

"शंभर दिनार! एवढ्या छोट्या समस्येचे! त्यापेक्षा मला पाच दिनार दे, मी तुला बरे करतो. " मुल्ला म्हणाला.

त्या माणसाने लगेच पाच दिनार मुलासमोर ठेवले आणि म्हणाला, "हे घ्या, सांगा उपाय. "

मुलाने त्या माणसाच्या बिछान्याचे पाय कापून टाकले. "आता भूत पलंगाखाली जाऊच शकणार नाही!" तो म्हणाला.





म्हाताऱ्याची शेती होती

म्हाताऱ्याची शेती होती
शेतीमध्ये बदके होती
क्वॅक क्वॅक क्वॅक क्वॅक करत होती
इकडे क्वॅक क्वॅक
तिकडे क्वॅक क्वॅक
इकडे तिकडे क्वॅक क्वॅक





म्हाताऱ्याची शेती होती
शेतीमध्ये डुकरे होती
फुर्र फुर्र फुर्र फुर्र करत होती
इकडे फुर्र फुर्र
तिकडे फुर्र फुर्र
इकडे तिकडे फुर्र फुर्र



म्हाताऱ्याची शेती होती
शेतीमध्ये गाय होती
हम्मा हम्मा करत होती
इकडे हम्मा
तिकडे हम्मा
इकडे तिकडे हम्मा

म्हाताऱ्याची शेती होती
म्हाताऱ्याची शेती होती
म्हाताऱ्याची शेती होती हो!

मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories

Published by

Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions



हौदाचा मृत्यू


ताताचारी आणि रामलिंगाडू शेजारी होते. ताताचारी स्वभावाने खूप चिक्कू आणि हावरट होता.


एक दिवस रामलिंगडूला एका छोट्या हौदाची गरज पडली. ताताचारीकडे हौद असेल तर घेऊन यावा म्हणून तो ताताचारीच्या घरी गेला.

"दिवसाला दोन रुपये असे हौदाचे भाडे द्यावे लागेल. ठीक आहे ना?" ताताचारीने विचारले. बिचाऱ्या रामलिंगडूला ही अट मान्य करावी लागली.

चार दिवसांनी रामलिंगाडू हौद परत करण्यासाठी आला. त्याच्या हातात एक लहानसा चंबू सुद्धा होता. "तुमच्या हौदाने या चम्बूला जन्म दिला. घ्या!" चंबू ताताचारीला देत तो म्हणाला.


ताताचारीने आनंदाने चंबू घेतला आणि काही न बोलता घरात निघून गेला.




काही दिवसांनी रामलिंगाडू एका आठवड्यासाठी ताताचारीचा हौद घेऊन गेला.

बरोबर एका आठवड्याने तो रिकाम्या हाताने ताताचारीकडे गेला आणि चेहेरा पाडून म्हणाला, "ताताचारी, तुमचा हौद मृत्यू पावला."

"हौद कसा मरू शकतो? ही तर फसवणूक आहे!" ताताचारी चिडून ओरडला.



"हौद जर चंबूला जन्म देऊ शकतो, तर मरु का नाही शकत?" रामलिंगडूने विचारले. ताताचारी यावर काहीच उत्तर देऊ शकला नाही!

मराठी - मानसी महाजन


A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam


12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

हत्ती आणि कुत्रा

एक होता राजा. त्याच्याकडे एक हत्ती होता. हत्तीची देखभाल एक माहूत करत असे.

माहुताचा एक पाळीव कुत्रा होता. कुत्रा नेहेमी माहुताबरोबर सगळीकडे जात असे.







हत्ती आणि कुत्रा एकत्र जेवत, खेळत. त्यांची अगदी घट्ट मैत्री झाली होती. हत्ती रोज कुत्र्याची वाट पाहत असे.

एकदा माहुताला पैश्यांची खूप निकड होती. त्याने कुत्रा एका श्रीमंत व्यापाऱ्याला विकला. कुत्र्याला खूप वाईट वाटले, पण आता नवीन मालकाबरोबर जाणे भाग होते.

हत्तीला कुत्र्याची खूप आठवण येत होती. त्याने अन्न पाणी सोडले. कोणलाही त्याचे कारण समजत नव्हते.

वैद्यांनी हत्तीला तपासले. "हत्तीला कोणताही रोग झालेला नाही. त्याला कोणाचीतरी आठवण येते आहे. " वैद्यांनी सांगितले.





"त्याचा खेळगडी, कुत्रा कुठे आहे? त्याला लगेच आणा!" राजाने फर्मान सोडले.

राजाची आज्ञा ऐकून श्रीमंत व्यापाऱ्याने लगेच कुत्र्याला सोडून दिले. कुत्रा ताबडतोब हत्तीकडे धावत गेला.

एकमेकांना बघून दोघांना खूप आनंद झाला, आणि ते आनंदाने नाचू लागले.

मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories

Published by

Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

सप, झुईं, धडाम

भोपळ्याची वेल कौलारू छतापर्यंत पोहोचली.

तरारली, खूप भक्कम झाली. लवकरच त्यावर अनेक भोपळे दिसू लागले.

त्या कौलांमध्ये एका उंदराने घर केले होते, आणि तो तिथे आनंदाने राहायचा.



घराभोवती हिरवेगार गावात उगवले होते. शेळी गवत खाण्यासाठी तिथे आली. तेवढ्यात उंदराने एका भोपळ्याचा देठ दाताने कापला...'सप'.

भोपळा घरंगळत,
'झुईं' करून घसरत
बरोबर शेळीवर
जाऊन
पडला...'धडाम'!
शेळी ओरडू
लागली.

तेव्हांपासून 'सप,
झुईं, धडाम' अशी
म्हणच पडली आहे!




गाढव आणि सिंह

एके दिवशी सिंह गाढवाला शिकारीला बरोबर घेऊन गेला.

"गाढव दादा, तुमचा आवाज किती बुलंद आहे! तुम्ही जमेल तेवढ्या जोरात रेका. तुमचा आवाज ऐकून सैरावैरा पाळणाऱ्या प्राण्यांची मी शिकार करेन." सिंह म्हणाला.

गाढवाने तसेच केले.




गाढव ओरडू लागताच प्राणी गोंधळून सैरावैरा धावू लागले.

सिंहाने प्राण्यांची शिकार केली. "फार उत्तम रेकतोस तू!" सिंहाने गाढवाची प्रशंसा केली.

तेव्हांपासून गाढवे इतरांकडून आपली प्रशंसा ऐकण्यासाठी रेकू लागली.

मराठी - मानसी महाजन



A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions



नाव विसरलेली माशी

सणासुदीच्या दिवशी एक माशी भिंतीवर शेण सारवत होती. काम करता करता ती तिचे नावाचं विसरली!

"माझं नाव काय?" ती भांबावून सर्वांना विचारात फिरू लागली.

तिला झाडाखाली बसलेली पेदारासी पेडम्मा दिसली.

तिने विचारले, "पेदारासी पेडम्मा, पेदारासी पेडम्मा, माझे नाव काय?"

"मला नाही माहित. जा माझ्या मुलाला विचार." पेडम्मा म्हणाली. मग माशी गेली पेडम्माच्या मुलाकडे.



"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला माझे नाव काय?" तिने विचारले.

"मला नाही माहित. जा माझ्या हातातल्या कुऱ्हाडीला विचार." तो म्हणाला.





मग माशी गेली कुऱ्हाडीकडे आणि म्हणाली, "पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, माझे नाव काय?"

"मला नाही माहित. जा, मी जे झाड तोडले त्या झाडाला विचार." कुऱ्हाड म्हणाली.

माशी गेली झाडाजवळ. "पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, माझे नाव काय?"

"मला नाही माहित. जा, माझ्या फांद्यांवर बसलेल्या पक्षाला विचार." झाड म्हणाले.

मग माशी गेली फांद्यांवर बसलेल्या पक्षाकडे.



"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, झाडावरच्या पक्षा, माझे नाव काय?" तिने विचारले.

"मला नाही माहित. मी जिथे पाणी पितो त्या तळ्याला विचार." पक्षी म्हणाला.




"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, झाडावरच्या पक्षा, पक्षी जिथे पाणी पितो त्या तळ्या, माझे नाव काय?" तिने विचारले.

"मला नाही माहित. माझ्यात पोहणाऱ्या माशाला विचार." तळे म्हणाले.

"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, झाडावरच्या पक्षा, पक्षी जिथे पाणी पितो त्या तळ्या, तळ्यातल्या माशा, माझे नाव काय?"

"मला नाही माहित. मला पकडू पाहणाऱ्या मुलाला विचार." मासा म्हणाला.

"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, झाडावरच्या पक्षा, पक्षी जिथे पाणी पितो त्या तळ्या, तळ्यातल्या माशा, मासा पकडणाऱ्या मुला, माझे नाव काय?"



"मला नाही माहित. मी चालवतो त्या घोड्याला विचार." मुलगा म्हणाला.



"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, झाडावरच्या पक्षा, पक्षी जिथे पाणी पितो त्या तळ्या, तळ्यातल्या माशा, मासा पकडणाऱ्या मुला, मुलाच्या घोड्या, माझे नाव काय?"

"मला नाही माहित. माझ्या पोटातल्या बाळाला विचार." घोडा म्हणाला.

"पेदारासी पेडम्मा, पेडम्माच्या मुला, मुलाच्या कुऱ्हाडी, कुऱ्हाडीने कापलेल्या झाडा, झाडावरच्या पक्षा, पक्षी जिथे पाणी पितो त्या तळ्या, तळ्यातल्या माशा, मासा पकडणाऱ्या मुला, मुलाच्या घोड्या, घोड्याच्या पोटातल्या बाळा, माझे नाव काय?"



"तुझं नाव...तुझं नाव...तुझं नाव...


म...म...मा..." बाळ बोबडं बोलू लागलं.

"अरे खरंच की! माझे नाव माशी!" आणि माशी आनंदाने घरी निघून गेली.

मराठी - मानसी महाजन


A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam
12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

निसर्गाची किमया



दुपारचे ऊन तापले होते.

बदामाच्या झाडाखाली एक शेतकरी विसावला. त्याच्या समोर कलिंगडाचा वेल होता. वेलीवर मोठी मोठी कलिंगडे लागलेली त्याला दिसली. तसेच बदामाच्या झाडावर छोटे छोटे बदाम लागलेले दिसले.




"एवढ्या नाजूक वेलाला एवढी मोठी कलिंगडे, आणि एवढ्या मोठ्या झाडाला एवढी लहान फळे!" त्याला नवल वाटले.

तेवढ्यात त्याच्या डोक्यात एक बदाम पडला.

"जर बदामाचे फळ कलिंगडाएवढे मोठे असते, तर आत्ता माझे काय झाले असते! खरे आहे, निसर्गाची किमया काही औरच आहे!" त्याने खुशीत विचार केला.

करून पहा




मुल्ला नासिरूद्दिन काही डागडुजी करण्यासाठी छतावर चढले आणि अचानक चक्कर येऊन खाली पडले.

शेजारी पाजारी गोळा झाले.

"काय झाले मुल्ला?" एकाने विचारले. "मुल्ला, भोवळ आली का?" दुसरा म्हणाला. "आता कसे वाटते आहे?" अजून एकाने विचारले.

"तुमच्या प्रश्नांनी माझा जीव घेऊ नका. वर चढा आणि माझ्यासारखे खाली पडा, सगळी उत्तरे मिळतील आपोआप," मुलाने उत्तर दिले.



मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

माझे कुटुंब



माझे नाव कल्पना.
मी सात वर्षांची आहे.
मी शाळेत जाते.
मी दुसऱ्या इयत्तेत शिकते.


मला गाणी गायला आवडतात.
मी खूप खेळ खेळते.
मला चित्रे काढायला खूप
आवडतात.

माझ्या धाकट्या भावाचे नाव आहे विनोद.

तो चार वर्षांचा आहे. तो सतत खेळत असतो. तो खूप गोड़ बोलतो. त्याला माझ्याबरोबर शाळेत यावेसे वाटते.

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर विनोद सुद्धा शाळेत जाणार आहे. मग आम्ही दोघे मिळून शाळेला जाऊ.





माझ्या वडिलांचे नाव आहे रंगा राव. सगळे त्यांना रंगा म्हणतात.

मी कधीकधी त्यांच्या बरोबर शेतात जाते. ते मला वेगवेगळे पक्षी, किडे, फुले, फळे दाखवतात.

माझ्या आईचे नाव आहे सुशीलम्मा. ती मला गाणी शिकवते. मला आणि माझ्या भावाला भरवते.


माझे आई आणि वडील शेतात काम करतात. ते शेतात पिके काढतात.



आमच्या गोठ्यात गायी आणि म्हशी आहेत.

वासरे इकडे तिकडे बागडत असतात. माझा भाऊ आणि मी त्यांना चारा घालतो.

त्यांच्या मानेभोवती घंटा बांधतो. आम्हाला त्या घंटेचा मंजूळ आवाज खूप आवडतो.



मराठी - मानसी महाजन

A Bagful of Stories

Published by

Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions

कोल्हा आणि करकोचा

कोल्हा आणि करकोचा मित्र होते.


"मित्रा, माझ्या घरी जेवायला ये." असे म्हणून कोल्ह्याने करकोच्याला घरी जेवायला बोलावले.



कोल्ह्याने खीर केली आणि बशीत वाढून करकोच्यासमोर ठेवली. करकोच्याने आपल्या लांब चोचीने बशीतून खीर खायचा खूप प्रयत्न केला, पण त्याला एकही घास घेता आला नाही.

कोल्ह्याने बशीतली खीर चाटून पुसून खाल्ली. "मित्रा, अरे असे खायचे असते." असे म्हणत त्याने सगळी खीर खाऊन टाकली. "रागावू नकोस मित्रा, जेवायला दुसरे काहीच केलेले नाही." कोल्हा म्हणाला.

"ठीक आहे मित्रा. पण आता तू लवकरच माझ्या घरी जेवायला आले पाहिजेस." करकोचा म्हणाला.



काही दिवसांनी कोल्हा करकोच्याच्या घरी जेवायला गेला. करकोच्याने माशाचे कालवण करून एका अरुंद तोंडाच्या भांडयात वाढले.

कोल्हा भांड्याभोवती गोल गोल फिरला. भांडे चाटून, हुंगून पहिले. भांड्याच्या अरुंद तोंडात कोल्ह्याचे तोंड जाईना. त्याला एकही घास खाता आला नाही.

"अरे मित्रा, हे बघ असे खायचे असते." असे म्हणत करकोच्याने आपली लांब चोच भांड्यात घातली आणि सगळे कालवण खाऊन टाकले. "रागावू नकोस, पण घरात जेवायला दुसरे काहीच नाही."

कोल्हा संतापला. मेजवानीच्या आशेने आलेला कोल्हा भुकेलाच परत निघाला. तेव्हापासून कोल्हा आणि करकोचा यांची मैत्री तुटली, ती कायमची.



टाळ्या वाजवा



टाळ्या वाजवा, टाळ्या वाजवा, जोरात टाळ्या
वाजवा
गाणे ऐका, गाणे ऐका, जोरात टाळ्या वाजवा.

पाय नाचवा, पाय नाचवा, तालात पाय नाचवा
गाणे ऐका, गाणे ऐका, तालात पाय नाचवा.



गोल फिरा, गोल फिरा, गरगर गोल फिरा
गाणे ऐका, गाणे ऐका, गरगर गोल फिरा.

उड्या मारा उड्या मारा उंच उड्या मारा
गाणे ऐका, गाणे ऐका, उंच उड्या मारा.

टाळ्या वाजवा, टाळ्या वाजवा, जोरात टाळ्या
वाजवा
गाणे ऐका, गाणे ऐका, जोरात टाळ्या वाजवा.

मराठी - मानसी महाजन





A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17, e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions


मुळा

एका आजोबांनी शेतात मुळा लावला. मूळ्याचे रोप वाढले, खूप मोठे झाले. मुळा काढण्यासाठी शेतकरी रोप मातीतून उपसू लागला, पण रोप काही बाहेर येईना. त्याने आजीला हाक मारली.



आजीने आजोबांना पकडले, आजोबांनी मुळ्याच्या रोपाला आणि दोघे मिळून ओढू लागले, ओढू लागले. तरीही मुळा काही बाहेर येईना. मग आजीने नातीला बोलावले.

नातीने आजीला पकडले, आजीने आजोबांना, आणि आजोबांनी मुळ्याच्या रोपाला. तिघे मिळून ओढू लागले, ओढू लागले. तरीही मुळा काही बाहेर येईना. मग नातीने कुत्र्याला बोलावले.



कुत्र्याने नातीला पकडले, नातीने आजीला , आजीने आजोबांना, आणि आजोबांनी मुळ्याच्या रोपाला. चौघे मिळून ओढू लागले, ओढू लागले. तरीही मुळा काही बाहेर येईना. मग कुत्र्याने मांजरीला बोलावले.

मांजरीने कुत्र्याला पकडले, कुत्र्याने नातीला, नातीने आजीला, आजीने आजोबांना, आणि आजोबांनी मुळ्याच्या रोपाला. सगळे मिळून ओढू लागले, ओढू लागले. तरीही मुळा काही बाहेर येईना. मग मांजरीने उंदराला बोलावले.

उंदराने मांजरीला पकडले, मांजरीने कुत्र्याला, कुत्र्याने नातीला, नातीने आजीला, आजीने आजोबांना, आणि आजोबांनी मुळ्याच्या रोपाला. सगळे मिळून ओढू लागले, ओढू लागले. शेवटी एकदाचा मुळा बाहेर आला!




तहानलेला कावळा



कावळ्याला तहान
लागली. त्याला एक पाणी
असलेला माठ दिसला.



पण पाणी अगदी
तळाशी होते.
तिथे पोहोचणार कसे?



तेवढ्यात कावळ्याला जवळच
पडलेले काही दगड दिसले.
त्याने चोचीने उचलून एक एक
करत सर्व दगड मठात टाकले.





दगड माठात खाली
पडले तसे पाणी वर
वर येऊ लागले.
कावळा मनसोक्त
पाणी प्यायला आणि
उडून गेला.

A Bagful of Stories
Published by
Manchi Pustakam

मराठी - मानसी महाजन



12-3-439, Street No. 1, Tarnaka, Secunderabad - 17. e-mail: info@manchipustakam.in; Ph.: 94907 46614, Illustrations: S. Pavani; Printed at Charita Impressions